नि.फौज केस क्र. ३७९/२०२१
निशाणी क्र. ३३

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.०१ यांची जबानी.**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की -
माझे नांव – संजय प्रल्हाद बांबल
वय सुमारे - ४६ वर्षे व्यवसाय - चालक
राहणार – - शेलगांव आटोळ, चिखली ता. बुलढाणा
जिल्हा – बुलडाणा

**सरतपासणी सरकारी वकील श्रीमती आर.एस. जाधव यांचेकडून**

मी आरोपींना ओळखतो. आज आरोपी समाधान पवार, निवृत्ती पवार, सुभाष पवार, सचिन पवार आज न्यायालयात हजर आहे. मी बाकीचे आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो. घटना हि दि. ०५.०७.२०२१ रोजी शांताराम गावडे यांच्या घरासमोर रात्री ९.०० वा. घडली. मी शेतातून घरी परत चाललो होतो. सर्व आरोपी तेथे आले व मला अडवले. आरोपींनी मला मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी दिली. आरोपी समाधान लक्ष्मण पवार, सुभाष सदाशिव पवार याने मला काठीने छातीवर, डाव्या पायावर, डाव्या हातावर मारले होते. त्यावेळी माझा भाचा अविनाश गुंड, पवन श्रीकृष्ण अंभोरे हे मला सोडवण्यासाठी आले. आरोपींनी पवन श्रीकृष्ण अंभोरे याला बेशुध्द होई पर्यंत काठीने मारहाण केली. माझा मुलगा गणेश याला आरोपींनी पायावर व डोक्यावर काठीने मारले होते. श्रीकृष्ण सखाराम अंभोरे यांना सर्व आरोपींनी काठीने पायावर, हातावर मारले होते. त्यानंतर मी अंढेरा पो.स्टेशन येथे जावून आरोपी विरुध्द रिपोर्ट दिला.

०२. आता मला अभिलेखावरील रिपोर्ट दाखवण्यात आले. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र. ३४** देण्यात येत आहे. आता मला अभिलेखावरील प्रथम खबर अहवाल दाखवण्यात आले. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र. ३५** देण्यात येत आहे. पोलीसांनी माझे बयाण नोंदवले नव्होते. पोलीसांनी मला त्यानंतर उपचारासाठी दवाखान्यात पाठवले होते. अंढेरा येथून आम्हाला देऊळगांवमही तेथून बुलढाणा येथे शासकीय रुगणालयात पाठवण्यात आले. फिर्यादीला ओ.पी. क्र. ६५/२०२५ वरील काठया दाखवण्यात आल्या. आरोपीने त्याला, त्याच्या मुलाला व श्रीकृष्ण अंभोरे, पवन अंभोरे यांना ज्या काठयांनी मारले होते हे त्याच काठया असल्याचे त्याने सांगीतले. त्यास एकत्रीतरित्या **मटेरियल ऑब्जेक्ट ०१** देण्यात येत आहे.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीचे विधिज्ञ श्री. टि.ए. शेख  यांचेतर्फे**

०३. मी प्रवासी वाहतूक करतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आमच्यामध्ये शेतीचा वाद सुरु आहे आणि तो वाद या घटनेपूर्वी पासून सुरु आहे. घटनेपूर्वी आरोपींनी माझे विरुध्द  कलम १०७ नुसार पोलीस व्दारे कार्यवाही कोली होती. हे म्हणणे खरे नाही की, तहसिलदार साहेब यांनी आमच्याकडून चांगले वागणूकीचे बॉड लिहून घेतले. शेलगांव आटोळ ते माझे शेताचे अंतर २ कि.मी. एवढे आहे. घटनेच्या आजूबाजूला दोन्ही बाजूने वस्ती आहे. मी पोलीसांना रिपोर्ट देते वेळी सांगीतले होते की, मला सोडवण्यासाठी गणेश आला होता, गणेश यास आरोपींनी लाठया काठयांनी मारहाण करुन पायावर, डोक्यावर मारहाण केली. सदरचा मजकूर माझ्या रिपोर्टमध्ये पोलीसांनी का नमूद केला नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, शेलगांव आटोळ ते अंढेरा येण्यासाठी १५ ते २० मिनिट एवढा वेळ लागते.  शेलगांव आटोळ येथे सरपंच, तंटामुक्ती अध्यक्ष आहे. मी सरपंच व तंटामुक्ती अध्यक्ष यांना घटनेबद्दल तोंडी किंवा लिखीत सांगीतले नव्होते. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही दि.०६.०७.२०२१ रोजी लेखी रिपोर्ट पोलीसांना दिला. तो रिपोर्ट जयसिंग राठोड यांनी तयार केला. हे म्हणणे खरे आहे की, लेखी रिपोर्ट ज्यांनी तयार करुन दिला त्यावर त्याची सही नाही.

०४. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी पावसाळयाचे दिवस होते. हे म्हणणे खरे आहे की, पावसाळयाच्या दिवसात ग्रामीण भागात सर्व जण आपआपल्या घरी असतात. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळेस आजूबाजूचे लोक त्यांची घरी होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझ्यावर दाखल केलेल्या  केसेस वापस घ्याव्या म्हणून मी खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला, माझ्या मुलाला, श्रीकृष्ण अंभोरे यांना लाठी काठीने मारहाण करुन जखमी केले हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी अश्लील शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली हे मी खोटे सांगत आहे. मी पोलीसांना रिपोर्ट देते वेळी सांगीतले होते की, पाच आरोपींनी पवनला काठीने बेशुध्द होईपर्यंत मारहाण केली. सदरचा मजकूर माझ्या रिपोर्ट मध्ये का नमूद केला नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी श्रीकृष्ण अंभोरेला पायावर, हातावर व डोक्यावर मारले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला, माझ्या मुलाला व श्रीकृष्ण अंभोरेला लाठया काठयांनी

मारहाण केली व जीवे मारण्याची धमकी दिली हे मी खोटे सांगत आहे. काठयांना कोठे रक्त लागलेले दिसत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझ्या नातेवाईकांनी जुन्या वादाच्या कारणावरुन आरोपी विरुध्द खोटी तक्रार दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by SMITA HARIDAS UKEY
Date: 2025.11.29 16:25:11 +0530

( श्रीमती एस.एच. उके )

दि. २०.११.२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिखली.